# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ०२ रा मंगळवार दि.२८ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# भारताच्या भागाला पीओके बनविले



नवी दिल्ली : केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते अनुराग ठाकूर यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला आहे. पाकिस्तानात नाही, तर भारतात निवडणुका होत असल्याचे म्हटले आहे. त्यांचे पाकिस्तानवर प्रेम आहे, भारतावर नाही असे म्हणत काँग्रेसवर टीकास्त्र सोडले आहे.

अनुराग ठाकूर म्हणाले की, काँग्रेसने देशाच्या एका भागाला पीओके बनवले आहे. काँग्रेसचे पाकिस्तानबद्दलचे प्रेम पाहून हेच दिसून येते की, त्यांचे नेते भारतात राहतात पण पाकिस्तानचे गुणगाण गातात. काँग्रेसची विचारसरणी पाकिस्तान समर्थक आहे. भारताच्या एका भागाला पाकव्याप्त काश्मीर बनवले आहे. हिमाचल प्रदेशमध्ये अनुराग ठाकूर यांनी काँग्रेस पाकिस्तानचे गुणगान का गात आहे? असा प्रश्न विचारला आहे. तसेच यावरून त्यांची मानसिकता दिसून येते. काँग्रेसचे भारतातील जनतेवर प्रेम नाही असे म्हटले आहे.

पुन्हा नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान होतील, असा दावा देखील अनुराग यांनी केला. गेल्या दहा वर्षांत हिमाचल प्रदेशच्या हमीरपूर लोकसभा मतदारसंघात शैक्षणिक क्रांती झाली आहे. आम्ही सातत्याने विकासकामं करत आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकांच्या हिताचा विचार करतात, पण काँग्रेस फक्त स्वत:चा विचार करते असेही ते म्हणाले. अनुराग ठाकूर हे हिमाचल प्रदेशातील हमीरपूर लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार आहेत. तर काँग्रेसने सतपालसिंग रायजादा यांना उमेदवारी दिली आहे. राज्यातील शिमला, हमीरपूर, मंडी आणि कांगडा या चार जागांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे.

# बीडमध्ये मराठा-वंजारी वाद विकोपाला

बीड : लोकसभा निवडणुकांतील प्रचारादरम्यान बीडमध्ये जातीय रंग पाहायला मिळाले. बीड हे मनोज जरांगेंचा मूळ जिल्हा असल्याने मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे केंद्र बनले होते. त्यातच, बीडमध्ये महायुतीच्या पंकजा मुंडे विरुद्ध महाविकास आघाडीच्या बजरंग सोनवणे यांच्यात थेट लढत झाली. मात्र, या लढतीवेळी काही प्रमाणात मराठा-वंजारी वाद स्थानिक पातळीवर दिसून आला. तर, निवडणुकांनंतरही तो जातीय वाद पुन्हा उफाळत असल्याचे पाहायला मिळत आहे. कारण, मराठा-वंजारी समाजात एकमेकांच्या दुकानातून खरेदी केल्यास दंड आकारण्यात येईल, असे सांगणारे काही व्हिडिओ समाजमाध्यमांतून समोर आले आहे. त्यानंतर, आता बीडचे पोलिस अधीक्षक मुंडेवाडीत पोहोचले होते.

बीड लोकसभा निवडणुकीत जाती-पातीचे राजकारण झाल्याचे शिक्कामोर्तब झाले. कारण याच राजकारणाचे पडसाद आता स्थानिक गावक-यांमध्ये उमटले. दोन गावांतील वंजारी समाजाच्या ग्रामस्थांनी थेट मराठा समाजाच्या व्यक्तींकडून काही खरेदी करू नये, असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, बीड लोकसभेतील जातीय संघर्ष टोकाला गेल्याचे दिसूनआला. अचानक हे गावकरी संतप्त का झाले? कोणती शक्ती यामागे आहे? नेमके कोण विष कालवत आहे? या अुषंगाने बीड जिल्ह्यात अनेक चर्चा रंगत आहेत. त्यासंदर्भात आात महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि मनोज जरांगे पाटील यांनी बाजू मांडली आहे.

पोलिस अधीक्षक मुंडेवाडीत पोहोचले

लोकसभा निवडणुकीत झालेल्या जातीय संघर्षाचे परिणाम बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी जाणवत आहेत. त्यातच मुंडेवाडी गावात वंजारी समाजातील नागरिकांनी मराठा समाजाच्या व्यक्तीकडून खरेदी करू नये, असा निर्णय घेतल्याची समोर आणल्यानंतर बीडचे पोलिस प्रशासन खडबडून जागे झाले आहे. एकमेकांच्या दुकानातून खरेदी नाही केल्यास पोलिस दंड आकारणार आहेत. बीडचे जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर हे मुंडेवाडीत पोहोचले असून याबाबत अधिक तपास करत आहेत.

मी जातीवाद होऊ देणार नाही - जरांगे पाटील

बीड जिल्ह्यातील सर्व मराठ्यांना माझं आवाहन आहे, शांततेत राहा, आता वेळ निघून गेली आहे. यापूर्वी देखील मराठा शांत राहिला आहे. लोकसभा होऊन गेली आता विधानसभेला बघू. अगोदर कोणाचे नाव घेतले नाही, त्यावेळेला नाव घेऊ, असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. वंजारी आणि मराठा समाजाचे कधी कुणाचे बांध कापलेत? तुम्हाला मतदान केलं तर चांगलं नाही केलं तर वाईट ही कसली लोकशाही?. मी कधी ओबीसी मराठा जातीवादी केला. मात्र, ग्राउंड लेव्हलवर कोण्या ओबीसीसोबत मी जातिवाद केला हे दाखवा. सुधीर भाऊ मुनगंटीवार म्हणाले होते, धनुभाऊ आणि पंकजा मुंडे कधीही जातिवाद करत नाहीत आता हे काय आहे? असा सवालही जरांगेंनी विचारला आहे.

सर्वांनी एकोप्याने राहिले पाहिजे - सोनवणे

मुंडेवाडी हे गाव चांगले आहे, तेथील लोक जातीवादावर काम करणारे नाहीत. केवळ वंजाराच नाही, तर दलित, बौद्ध समाजही गावात आहे.

# वाढत्या उष्णतेबाबत आता सरकारकडून सूचना!

नवी दिल्ली : सध्या देशासह राज्यात विविध ठिकाणी उष्णतेत वाढ होताना दिसत आहे. देशातील काही भागात तापमानाचा पारा आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अशात अनेक लोकं घरातून बाहेर पडणे टाळतायत. तर काही जणांना कामानिमित्त बाहेर पडण्याशिवाय पर्याय नाही, अशात कर्मचा-यांनी वाढती उष्णता आणि उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने कर्मचा-यांसाठी खास सल्ला दिला आहे. आरोग्य मंत्रालयाने याबाबत सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे.सध्या सतत वाढत असलेल्या तापमानामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण हैराण झाले आहेत. अशा वातावरणात बाहेर काम करणा-या लोकांची अवस्था तर आणखीनच बिकट आहे. हे लक्षात घेता, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने कर्मचा-यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाय अवलंबण्यास सांगितले आहे, जेणेकरून कर्मचा-यांना कोणत्याही प्रकारची समस्या येऊ नये. तापमानात सातत्याने वाढ होताना दिसत आहे, अशात लोकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.

उन्हामुळे लोकांना दिवसाच नाही तर रात्रीही आराम मिळत नाही. आरोग्य मंत्रालयाने कामाच्या ठिकाणी देखील अति उष्णता आणि उष्णतेच्या लाटेपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपायांचा अवलंब करण्याचा सल्ला दिला आहे. जेणेकरून कर्मचा-यांना कोणतीही अडचण येणार नाही. आरोग्य मंत्रालयाने त्यांच्या सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्यांनी कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समान सुविधा देण्यास सांगितले आहे. तसेच, कर्मचा-यांना दिवसाच्या कडक उन्हात बाहेर ड्यूटी करणे टाळण्यास सांगितले आहे. जेव्हा हवामान थंड असेल तेव्हाच बाहेरील कामे शेड्यूल करा, कर्मचा-यांना देखील विश्रांती द्या. असे म्हटले आहे.

काय आहेत सामान्य लक्षणे?

आरोग्य मंत्रालयाने कर्मचा-यांना उष्णतेशी संबंधित आजारांची लक्षणे ओळखण्यासाठी प्रशिक्षण देण्याचा सल्लाही दिला आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंती निमित्ताने रेणा कारखान्याच्या वतीने सर्वरोग निदान शिबिरात २५१ रुग्णाची मोफत तपासणी



लातूर राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दिलीप नगर निवाडा तालुका रेणापूर येथील रेणा कारखाना साईट येथे उभारलेल्या लोकनेते विलासराव देशमुख साहेबांच्या पुर्णाकृती पुतळा व स्मृतीसंग्रहालय स्थळी आदराजंली वाहण्यात आली त्यांनतर वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न झाला सामाजिक उपक्रम म्हणून रेणा साखर दिशा प्रतिष्ठाण यांच्या वतीने ग्रामीण रुग्णालय, रेणापूर येथे मोफत सर्व रोग निदान शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते सदरील शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख साहेब यांच्या हस्ते करण्यात आले या शिबिरात एकूण २५१ रुग्णाची तपासणी करून त्यांना औषधी वाटप करण्यात आली ज्या रुग्णांना पुढील उपचार करणे आवश्यक आहेत त्यांना कारखान्याच्या वतीने पुढील उपचार करण्यात येणार आहेत.

स्पेशालिस्ट डॉक्टरांनी केली रुग्णाची तपासणी या शिबीरात डॉ. अजिम मशायक (नेत्रतज्ञ), डॉ. निखील काळे,(पोट विकार व लॅप्रोस्कोपीतज्ञ), डॉ. कृष्णा कोतवाडे, (हृदयरोगतज्ञ), डॉ. अनिता अलगुले, (स्त्रीरोगतज्ञ), डॉ. सुवर्णा बिराजदार (स्त्रीरोगतज्ञ), डॉ.महेश शिंदे (एमडी मेडीसीन), डॉ. प्रदिप नागुरे (शुगर स्पेशालीस्ट ), डॉ. पद्मसिहं बिराजदार (बालरोगतज्ञ), डॉ. पठाण (बालरोगतज्ञ), डॉ. नागापूरे (बालरोगतज्ञ) या तज्ञ डॉक्टर्स यांनी सहभाग नोंदविला

यावेळी रेणा कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हाइस चेअरमन अनंतराव देशमुख, माजी आमदार तथा संचालक त्र्यंबकराव भिसे, माजी चेअरमन तथा संचालक यशवंतराव पाटील, ट्वेंटी वन शुगरचे व्हाइस चेअरमन विजय देशमुख, रेणा चे संचालक प्रेमनाथ आकानगिरे, धनराज देशमुख, प्रवीण पाटील, संजय हरीदास, संग्राम माटेकर, संभाजी रेड्डी, तानाजी कांबळे, पंडित माने, स्नेहलराव देशमुख, अनिल कुटवाड, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे, ग्रामीण रुग्णालयतील डॉ. अनिता अलगुले, त्यांचा स्टाफ व दिशा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष सोनू डगवाले, सौ. पूजा इगे कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषेराव हाके यांच्यासह कोंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनी, विलास कारखाना येथे केले अभिवादन



लातूर/ प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रिय मंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख यांचे भव्य स्मारक विलास सहकारी साखर कारखाना लि. वैशालीनगर, निवळी येथे उभारण्यात आले आहे. रवीवार दि. २६ मे रोजी आदरणीय विलासरावजी देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनानिमीत्त सर्व संचालक, सभासद यांनी स्मारक स्थळी पुष्पाजली अर्पन करून अभिवादन केले. विलास सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आदरणीय विलासरावजी देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनानिमीत्त सर्व संचालकांच्या उपस्थितीत पुष्प अर्पन करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र व्ही. काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, संचालक गोविंद बोराडे, अनंत बारबोले, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, अमर मोरे, रजित पाटील, गोविंद डूरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर यांच्यासह कारखाना सभासद, शेतकरी, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व कामगार तसेच ऊस तोडणी ठेकेदार आदी उपस्थित होते.


# मनपाच्या सावित्रीबाई फुले शाळेचा शंभर टक्के निकाल

लातूर/प्रतिनिधी: २०२३- २४ या शैक्षणिक वर्षात झालेल्या शालांत परीक्षेत मनपाच्या पीएमश्री सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक ९ चा निकाल १०० टक्के लागला आहे.या यशाबद्दल मनपा आयुक्तांसह अधिकाऱ्यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

या शाळेतील विनायक विजयकुमार जाधव हा ८९.२० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम आला.त्या खालोखाल ८०.६० टक्के गुण घेणारा रोहित मंगलसिंग खिक्ची याने शाळेतून दुसरा क्रमांक पटकावला.वैभव शामराव फुलारी यास ७९ टक्के, पायल महादेव क्षीरसागर हिला ७८.२० टक्के, रूपाली पांडुरंग परांडे या विद्यार्थीनीस ७५.८० टक्के,पुजा दामा हिला ७५.२० टक्के गुण मिळाले.परीक्षेला बसलेले शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे,अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार,उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे-पाटील शिक्षणाधिकारी साहेबराव जाधव यांनी उत्तीर्ण विद्यार्थी,शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# जल जीवन मिशनच्या कामांना गती देण्यासाठी शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे



लातूर :- जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेच्या कामांना गती देण्याबाबत वारंवार सूचना देवूनही काही कामे अद्यापही अपेक्षित गतीने होत नसल्याचे दिसून येत आहे. या कामांना गती देण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. पाणी टंचाई उपाययोजना आणि जल जीवन मिशनच्या कामांचा आढावा घेण्यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, उप अभियंता यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांची यावेळी उपस्थिती होती.

जल जीवन मिशनच्या विहिरी, बांधकामे यासारखी कामे पावसाळ्यापूर्वी होणे आवश्यक आहे. तसेच ज्या गावातील योजनेचे किरकोळ काम शिल्लक आहे, अशी कामे येत्या सात दिवसाच्या आत पूर्ण करावीत. जागेची अथवा इतर अडचणीमुळे कामांमध्ये दिरंगाई होत असल्यास तहसीलदार, गट विकास अधिकारी, संबंधित उप अभियंता, ग्रामसेवक यांनी समन्वयातून याविषयी तोडगा काढावा. तसेच अद्यापही अपेक्षित प्रगती नसलेल्या कामांना गती देवून ही कामे लवकरात लवकर पूर्ण होतील, यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच यापुढे या योजनेचा दैनंदिन आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. पाणी टंचाईच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने कार्यवाही जलदगतीने होण्यासाठी उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे याबाबतचे कोणतेही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच प्रत्येक तालुकानिहाय उपाययोजनांचा आढावा घेतला. जल जीवन मिशनची काम तातडीने पूर्ण करण्यासाठी यापूर्वी देण्यात आलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या योजनेच्या कामात कोणत्याही प्रकारचा अडथळा आणल्यास संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात येईल. गट विकास अधिकारी यांबी याबाबत अहवाल सादर करावेत, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. तसेच पाणी टंचाईच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा त्यांनी आढावा घेतला.

## संपादकीय....

# करू नये तेंचि करी..

विद्यामान शैक्षणिक विचारकुल हे या देशास विश्वगुरूपदी पोहोचण्यातील सर्वात मोठा अडथळा आहे आणि सध्या त्याच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न सुरू आहेत. यात महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्र दुहेरी दुर्दैवी. भारतीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता हा आधीच चिंताविषय बनलेला असताना महाराष्ट्राचे शिक्षण खाते ही गुणवत्ता अधिकाधिक घसरावी यासाठी मोठ्या जोमाने प्रयत्न करताना दिसते. कसे; त्याचा तपशील गतसप्ताहात 'लोकसत्ता'ने दोन वृत्तान्तांद्वारे दिला. ते वाचून शिक्षणासाठी येथे राहावयाची वेळ ज्यांच्यावर आलेली आहे त्यांच्याविषयी कणव आणि सहानुभूती दाटून येते. देशांतर्गत, देशवादी ज्ञानविज्ञानात जे जे उत्तम उदात्त उन्नत याचा परिचय पुढील पिढीस जरूर करून दिला जायला हवा. पण त्यासाठी आधुनिक ज्ञान–विज्ञानाकडे पाठ फिरवण्याची गरज नसते. वास्तविक प्रगतीचा मार्ग न सोडता प्रादेशिकता कशी राखावी यासाठी केवळ महाराष्ट्रानेच नव्हे तर देशानेही दक्षिणी राज्यांचे अनुकरण करणे अगत्याचे आहे. तथापि ही दक्षिणी राज्ये हिंदी भाषकांच्या रथयात्रेत सहभागी होत नसल्याने शत्रुवत. त्यामुळे त्यांच्या चांगल्याचेही अनुकरण करण्याचा उदारमतवाद सत्ताधीशांकडून दाखवला जाणे अशक्य. अशा वेळी स्वत:च्या पोराबाळानातवांना 'वाघिणीच्या दुधावर' पोसून विकसित देशांत त्यांची पिढीप्रतिष्ठा झाल्यावर स्थानिक भाषा–संस्कृतीच्या नावाने गळा काढणाऱ्या येथील दांभिकांकडून देशीवादाचा सुरू असलेला उदोउदो ही केवळ लबाडी ठरते. तीस आता साथ आहे ती इंग्रजीवर प्रभुत्व नाही म्हणून स्थानिक भाषावादी बनलेले, आधुनिक विज्ञानात काडीचीही गती नाही म्हणून पुराणवादी झालेले आणि नव्याने परदेशी दिवे लावण्याची क्षमता नाही म्हणून देशीवादी झालेल्या अनेकांची. त्यामुळे शिक्षण क्षेत्राचा पुरता बट्ट्याबोळ झाल्यानंतरही जे उरले आहे त्याचीही माती करण्याच्या सरकारी प्रयत्नांचा समाचार घेणे कर्तव्य ठरते. निमित्त नव्या शिक्षण धोरणानुसार राज्यातील अभ्यासक्रम आणि अनुषंगाने पाठ्यपुस्तके बदलाच्या खटाटोपाचे. भारतीय ज्ञानप्रणाली हा विषय राष्ट्रीय धोरणकर्त्यांच्या आग्रहाने अभ्यासक्रमांत समाविष्ट करण्यात आलेला आहे. भारतातील ज्ञान, परंपरांची जाण विद्यार्थ्यांठायी निर्माण व्हावी हा त्यामागील हेतू. हेतूलाच त्वेषाने विरोध करावा असे यांत वरकरणी काही नाही. कोणत्याही संस्कृतीत इतिहासाच्या कोणत्या तरी टप्प्यावर काही तरी चांगले घडलेले असतेच. ते का हे समजून घेऊन त्या चांगल्याच्या पुनरावृत्तीसाठी प्रयत्न करण्यात काहीच गैर नाही. इतिहासातील त्या चांगल्याचे काळाच्या कसोटीवर योग्य ते विश्लेषण करून त्यातील जे इष्ट ते जरूर स्वीकारायला हवे. परंतु म्हणून सर्वच विषय भारतीय ज्ञान प्रणालीच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न करणे यात अजिबात शहाणपण नाही. ती चौकट हा खरा आक्षेपाचा मुद्दा. त्याचे उदाहरण म्हणजे राज्याच्या अभ्यासक्रम आराखड्यात तिसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी 'मनाचे श्लोक' आणि नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गीतेचा बारावा अध्याय पाठ करण्याची स्पर्धा आयोजित करण्याची सूचना. बहुसांस्कृतिक, सर्वसमावेशक, बहुधार्मिक आणि मराठीचा रास्त अभिमान बाळगून बहुभाषिक असलेल्या महाराष्ट्रात अभ्यासक्रम आराखड्यातील हा लटका आग्रह अनेक प्रश्न उपस्थित करणारा ठरतो. वास्तविक अशा स्वरूपाच्या स्पर्धा कित्येक पिढ्या शाळांतून चालत आलेल्या आहेत. मात्र त्याच्या सार्वत्रिकीकरणाचा अट्टहास हा येथील अनेक सांस्कृतिक, सामाजिक पदरांना धक्का देणारा आहे. म्हणूनच 'मनाचे श्लोक' किंवा गीतेतील अध्याय शिकवणे हे चांगले की वाईट यापेक्षा त्याच्या पाठांतराची स्पर्धा हा अभ्यासक्रमातील अधिकृत भाग ठरवण्याच्या प्रयत्नांत ''आम्ही म्हणतो तीच संस्कृती'' हा लपवता न आलेला अभिनिवेश खचितच धोकादायक ठरतो. यात सामाजिक, सांस्कृतिक संदर्भानुसार अशा स्पर्धा, उपक्रम घेण्याचे शाळांचे स्वातंत्र्यही संकोचण्याचा धोकाही आहे. आता यावर ''अशा स्पर्धांचा उल्लेख ही फक्त सूचना आहे. त्याचे बंधन नाही'' वगैरे प्रशासकीय शब्दच्छली स्पष्टीकरणेही दिली जातील. त्यात अर्थ नाही. कारण शासकीय कागदपत्रांमधील 'प्रेमळ सूचना' आणि उल्लेखांचे बंधन किती दूर सारता येते हे सर्वज्ञात आहे. मुळात अभ्यासक्रम आराखड्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि गांभीर्यानेच पाहाव्या अशा दस्तावेजाची मांडणी करताना सामाजिक, सांस्कृतिक वादांचे भान सदस्यांना का नसावे हाही उपस्थित होणारा दुसरा गंभीर प्रश्न. ते हवे कारण किमान शिक्षण हा विषय राजकारणापासून दूर असणे आवश्यक आहे. टाळता येणे शक्य असताना सातत्याने अनाठायी वाद ओढवून घेण्याचा शिक्षण विभागाला असलेला सोस हाही काळजीचा मुद्दा.

दुसरा मुद्दा इंग्रजी भाषा शिक्षणाचा. ही भाषा शिकण्याचे बंधन काढून टाकण्याचा निर्णय हा समिती सदस्यांचे स्थल–काल भान आणि बौद्धिक सारासारविचार क्षमता याबाबत आणखी शंका उपस्थित करतो. ज्या शिक्षण धोरणाच्या दाखल्याने हा उद्योग सुरू आहे त्या धोरणाचा मसुदा हा आधी इंग्रजीतच प्रसिद्ध करण्यात आला होता आणि तो स्थानिक भाषेत उपलब्ध होण्यास अनेक दिवस गेले होते, याचा विसर या सदस्यांनाच पडल्याचे दिसते. ज्या देशातील शासकीय पत्रके, निर्णय हेदेखील आधी इंग्रजीत लिहिले जातात, ते प्रमाण मानले जातात त्या देशातील एका राज्यातील विद्यार्थ्यांना या भाषेपासून फारकत घेण्याची मुभा ही अनाकलनीय आहे. तेवढीच अनाकलनीय बाब राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळेत मराठी शिक्षणाची सक्ती करण्याच्या निर्णयाशी फारकत घेण्याची. शालेय शिक्षण म्हणजे भविष्यात लागणाऱ्या संकल्पनांचा पाया तयार करणारी रचना. त्यासाठी परिसरात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या भाषा बोलता, वाचता, लिहिता येणे, गणितातील मूलभूत गोष्टींचा वापर करता येणे, विज्ञानातील मूलभूत संकल्पना स्पष्ट असणे, सामाजिक भान निर्माण होईल इतकी इतिहासाची जाण, या देशातील कायदे, लोकशाहीतील मुख्य घटक, रचना यांची माहिती ही किमान अपेक्षा. ती या सदस्यांस नसावी हे त्यांच्याकडून दिल्या गेलेल्या पर्यायी विषयांच्या यादीतून दिसते.

अभ्यासक्रम आराखडा ही पुरेशी स्वयंस्पष्ट शब्दरचना आहे. असलेली माहिती, ज्ञान, संकल्पना यांची विविध विषयांच्या चौकटीत कशी विभागणी करावी, कोणते विषय असावेत, प्रत्येक विषयात वयानुरूप किंवा इयत्तेनुरूप विद्यार्थ्यांना कोणते घटक का आणि कसे शिकवावेत आणि विद्यार्थी अपेक्षित गोष्ट शिकला आहे का याची पडताळणी कशी करावी याची रूपरेषा म्हणजे अभ्यासक्रम आराखडा.

# बाबासाहेबांच्या जिवनातील माता रमाई आणि माईसाहेब यांचा स्मृतिदिन

रमाबाई भीमराव आंबेडकर (जन्म ७ फेब्रुवारी १८९८ मृत्यू २७ मे १९३५) या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत्या.आंबेडकरानुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात.त्यांच्या जीवन संघर्षावरील एक प्रेरणादायी गीत आजकाल सर्वच ठिकाणी आणि सर्वच वयाच्या लोकांना तन,मन,धनाने आकर्षित करते.नांदण नांदण होत रमाचा नांदण ११ फेब्रुवारी २०२१ पासून आज पर्यंत ३७ लाख लोकांनी हे गीत लाईक केले आहे.तर ४५ लाख १९ हजार ६९३ लोकांनी ते पहिले आहे.हे गीत प्रकाश पवार यांनी लिहले होते. हर्षद शिंदे यांनी संगीत दिले देऊन आनंद शिंदे यांनी ते गायिल्या मुळेच अजरामर झाले आहे.कडूबाई खरात डी जे च्या तालावर आता युट्युब वर अनेक गायकांनी ते परत परत गाऊन लाखो लोकांना गुणगुणायला व शरीर हलव्याला हे गीत मजबूर करते.

शाळेत असतानाच १९०६ मध्ये १४–१५ वर्षीय भीमरावांचे लग्न दापोलीच्या भिकू वलंगकर यांची कन्या रामीबाई उर्फ रमाबाई ८–९ वर्षाची असतांना झाले. रमाबाई ह्या बाबासाहेब याच्या प्रत्येक आंदोलनात मनाने सहभागी होत्या पण शरीराने नाही.मुलगा आजारी आहे घरात पैसा अदला नाही.नवरा तिकडे समाजसेवा करतो. असे सहन करणारी महिला आज शोधून सापडणार नाही. त्या आजारात मुलगा मरण पावतो तरी ती महिला विचलीत होवुन नवऱ्या बाबत राईचा पर्वत बनवित नाही.परिस्थिती समजुन घेते.याला भावनिक मुद्दा कसा म्हणता येईल?.हा समंजसपणा,दूरदृष्टिपणा होता.त्याला दुरदुष्टी म्हणता येईल.हा मंत्र आज महिलांनी घेणे गरजेचा आहे.आज समाज ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत त्याचे (बाबासाहेबाचे) कुटुंब त्याकाळी होते.त्याकाळी बाबासाहेब आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलावी यासाठी शिकत नव्हते तर समाजाची एकूण सर्व परिस्थिती बदलण्या करीता शिकत होते.हे माता रमाबाई समजू शकत होती. आजची एकही माता असा विचार करणारी दिसणार नाही.संपूर्ण देश बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात होता.गांधी पुण्याला उपोषणाला बसले तेव्हा ते त्यात मरणार. त्याचा संपूर्ण राग माझ्या समाजावर निघणार याची कल्पना बाबासाहेब यांना होती.तेव्हा रमाबाईची मानसिक परिस्थिती काय असेल.घरात आणि बाहेर होणाऱ्या चर्चा पेपरात येणाऱ्या बातम्या रमाबाईला अस्वस्थ करीत होत्या. काय वर्णन करून ठेवले आपल्या थोर विचारवंतांनी?.



रमाबाईचा जन्म कुठे झाला, आईवडील काय करता होते,घरची गरीब परिस्थिती तिचे,दु:ख आजार यांचे वर्णन करणारे लेखक समाजाला काय संदेश देण्यासाठी लिहतात. बाबासाहेबांना रमाबाई ची कशी साथ होती त्यावर लक्ष केंद्रित करून लिहले पाहिजे,ते प्रेरणादायी होईल. नवरात्रात शारदा,सरस्वती,अंबिका,लक्ष्मी श्रीदेवी यांचावर लिहणारे कधी जन्म,आईबाप,भाऊ बहीण,शिक्षण,संसार,नवरा,मुलगा मुलगी,सासु सासरे,त्याने गांव तालुका जिल्हा,राज्य यांचा उल्लेख कुठेच येऊ देत नाही. हिंस प्राणी वाहन कसे होते.यावर कधीच लिहल्या जात नाही.सर्व भर नवस,कडक उपवास, मनोभावे पूजा नेवैद्य यातुन होणार चमत्कार साक्षातकार प्रसन्नता यांचा किती मोठा प्रभाव आजच्या उच्च शिक्षित महिलांच्या वर आहे.हे सिद्ध होत आहे. आपण बाबासाहेबांची रमाई कशी सांगितली पाहिजे,कष्ट,त्याग आणि जिद्दीने पती मागे उभी राहणारी. म्हणूनच गीतकार प्रकाश पवार यांचे नांदण नांदण होत रमाचा नांदण गीत खूपच अर्थ पूर्ण आहे.२७ मे १९३५ ला रमाबाई चे दुखद निधन झाले.तो काळ १९०७ ते १९२७ भिमराव आंबेडकर आठरा अठरा तास अभ्यास करून वेगवेगळ्या विषयांच्या पदव्या घेत होते.नंतर १९२७ ते १९३५ चा बाबासाहेबांचा जनसंघर्ष डोळ्या समोर आणा तेव्हा रमाबाई आपल्या पती कडून काय अपेक्षा करीत होत्या.आणि बाबासाहेब काय करत होते.ते दिवस डोळ्या समोर ठेऊन लिहा.

माता रमाई २७ मे १९३५ ला गेल्या नंतरचा बाबासाहेबांच्या जीवन संघर्षाचा अभ्यास करा.डॉ.सविता भीमराव आंबेडकर (जन्म : मुंबई, २७ जानेवारी १९०९; – मुंबई, २९ मे २००३) ह्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुसऱ्या पत्नी व व्यवसायाने एमबीबीएस डॉक्टर होत्या.आंबेडकरानुयायी त्यांना आईची उपमा देत त्यांना माई किंवा माईसाहेब नावाने संबोधतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधान लिखाणाच्या काळात,हिंदू कोड बिल आणि त्यांच्या धर्मांतराच्या निर्णयाच्या वेळी, माईसाहेब बाबासाहेबांच्या साथीला होत्या.

सविता आंबेडकर यांचा जन्म २७ जानेवारी १९०९ रोजी मुंबईत रोजी एका मराठी सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला होता. त्यांचे माहेरचे नाव शारदा कबीर होते. त्यांचे घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील दोरला गावचे होते. त्यांचे वडील कृष्णराव कबीर इंडियन मेडिकल काउन्सिलचे रजिस्ट्रार होते. कृष्णरावांना पाच मुली व तीन मुले होती. या एकूण आठ मुलांपैकी ६ भावंडांचा विवाह आंतरजातीय झाला. त्यांच्या त्या काळातही पुरोगामी विचारांचा त्यांच्या कुटुंबावर प्रभाव होता.आणि माईसाहेबांना त्याचा मोठा अभिमान वाटे.शारदा ह्या विद्यार्थिदशेत अत्यंत हुशार होत्या. त्यांनी आपले शालेय शिक्षण पुण्यात घेतले व नंतर मुंबईच्या ग्रन्ट मेडिकल कॉलेज मधून डॉक्टरीसाठी एम.बी.बी एस ही पदवी ही पदवी मिळवली होती. त्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात असतांना अभ्यास नी आपण एवढीच त्यांची दिनचर्या होती. या वसतिगृहासमोरच असलेल्या 'मणिभवन' येथे १४ ऑगस्ट १९३१ रोजी बाबासाहेब आंबेडकरांची महात्मा गांधीशी मोठी खडाजंगी झाली होती. पण त्या भेटीसंबंधी त्यांना वसतिगृहात असूनही काहीच माहिती नव्हती.त्यांचे एम.डी.च्या परीक्षेचे पेपर्स अत्युत्तम गेले. पण ऐन प्रॅक्टिकल परीक्षेच्या वेळी त्यांना टायफॉईड, डिहायड्रेशन,बॉईल्स असे आजार झाले व त्यांचे एम.डी.होणे राहून गेले.याच काळाच त्यांनी वैचारिक पुस्तकांचे वाचन केले.

शारदा कबीर यांनी गुजरात मध्ये काही काळ चीफ मेडिकल ऑफिसर म्हणून एका हॉस्पिटलमध्ये काम केले, नंतर त्या मुंबईत आल्या आणि निष्णात फिजिओथेरपिस्ट, नामवंत सल्लागार व तज्ज्ञ डॉक्टर अशा मालवणकरांबरोबर काम करू लागल्या. तेथे इ.स. १९४७ साली त्यांची आणि रक्तदाबाच्या आणि मधुमेहाच्या विकाराने ग्रस्त असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भेट झाली. त्यापूर्वी डॉ.राव यांच्या घरी त्यांची भेट झाली होती. डॉ.आंबेडकरांची पहिली पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे २७ मे १९३५ रोजी निधन झाले होते. त्यानंतर बाबासाहेबांनी प्रकृतीच्या कारणामुळे डॉक्टर असलेल्या शारदा कबीर यांचेकडून वैद्यकीय सेवा घेतली.मुंबईच्या विलेपार्लेमध्ये राहणारे डॉ.एस.राव आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे घनिष्ठ संबंध होते. तसेच डॉ.शारदा कबीर यादेखील डॉ.राव यांच्या घरी येत जात असत. कारण त्यांच्या मुली आणि शारदा मैत्रिणी होत्या. त्यांच्याच घरी इ.स.१९४७ मध्ये शारदा कबीर आणि बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली भेट झाली, त्यावेळी राव यांनी त्या दोघांची एकमेकांशी ओळख करून दिली.आंबेडकर जेव्हा जेव्हा मुंबईला येत तेव्हा ते डॉ.मालवणकरांच्या कन्सल्टिंग रूमवर प्रकृतीच्या तपासणीसाठी जात. मालवणकरांनी आंबेडकरांना अनेक पथ्ये आणि औषधांबाबत अनेक सूचना दिल्या होत्या. आंबेडकरांना या गोष्टी जमण्यासारख्या नसल्याने डॉ. कबीर यांनी 'एखादी नर्स ठेवा किंवा मी तुमच्याकडे काही दिवस राहून बाईंना (सौ. आंबेडकरांना) सर्व समजावून सांगेन', असा सल्ला दिला. डॉ.शारदा कबीर यांना तेव्हा रमाबाईंच्या निधनाबाबत माहिती नव्हती. पुढे बाबासाहेब आंबेडकर एकदा डॉक्टर मालवणकरांच्या कन्सल्टिंग रूमवर आले असताना डॉ.कबीर त्यांना पथ्यपाण्याबाबत सांगू लागल्या. अखेर त्यांना बाबासाहेब म्हणाले, 'अहो पण माझ्या घरात बाईमाणूस नाही, मी अगदी एकटा आहे, हे सर्व कोणाला सांगू?'. त्यावेळी डॉ.शारदा यांना आंबेडकरांच्या एकाकीपणाबाबत समजले. त्यानंतर दोघांची पुन्हापुन्हा भेट होऊ लागली. डॉक्टर आणि पेशंट म्हणून डॉ. आंबेडकरांशी त्यांचे नाते घट्ट झाले होते. त्यावेळी 'कोणी मला माझे बाबासाहेबांशी लग्न होईल,असे सांगितले असते,तर मी ते कधीही मान्य केले नसते', असे डॉ.माईसाहेब स्पष्टपणे कबूल करतात.मात्र त्यांच्या मनात बाबासाहेबांविषयी अत्यंतिक आदर आणि सहानुभूती होती.

एकदा इ.स. १९४७ च्या डिसेंबरमध्ये बाबासाहेब डॉ.मालवणकरांच्या कन्सल्टिंग रूमवर गेले असताना बाबासाहेबांनी शारदा यांना म्हणाले, 'चला,मी तुम्हाला घरी सोडतो,मलाही राजगृहाला जायचे आहे.' त्यापूर्वीही अनेकदा आंबेडकर आणि शारदा कबीर एकत्र बसून बोलायचे. अनेक विषयांवर त्यांच्या चर्चा व्हायच्या. या भेटींमुळे बाबासाहेबांबद्दल सविता यांना बरीच सखोल माहिती मिळाली होती. त्यातून त्यांच्या मनातील आदर अधिकच वाढला होता. एक दिवस आंबेडकर डॉ.सविता यांना म्हणाले. माझे सहकारी मला पुन्हा लग्न करण्याचा आग्रह करत आहेत. पण मला माझ्या आवडीची, योग्यतेची स्त्री मिळणे फार कठीण आहे. तरीही माझ्या कोट्यवधी बांधवांसाठी मला जगायला हवे. त्यामुळे माझी काळजी घ्यायला कोणीतरी असायला हवे. त्यामुळे माझ्यासाठी सुयोग्य स्त्रीचा शोध मी तुमच्यापासून सुरू करतो. अशा प्रकारे बाबासाहेबांनी त्यांना लग्नाची मागणी घातली. पण त्यावर तेव्हा काय उत्तर द्यायचे हे न समजल्याने डॉ.कबीर गप्पच राहिल्या. त्यानंतर डॉ.आंबेडकर दिल्लीला निघून गेले आणि शारदाही



त्यांच्या कामात गुंतल्या. त्या दिवसाबाबतही त्या विसरून गेल्या. पण एक दिवस अचानक शारदा यांना एक पार्सल मिळाले. पार्सलसोबतच्या पत्रात बाबासाहेबांनी डॉ.शारदा यांना मागणी घातली होती. पत्रात लिहिले होते, 'अर्थात तू तयार असशील तरच. तरी तू विचार करून मला कळव. तुझ्या आणि माझ्या वयांतील फरक आणि माझी प्रकृती या कारणांनी तू मला नकार दिलास तरी मला बिलकुल दु:ख होणार नाही'. पत्र वाचल्यानंतर मात्र डॉ.सविता यांना बाबासाहेबांच्या मनातील भावना समजल्या. त्या बाबासाहेबांच्या मोठेपणाने दिपून गेल्या. त्यांच्याबाबत आदर असला तरी त्यांची जीवनसाथी होण्याचा विचार त्यांच्या मनात नक्कीच नव्हता. त्यामुळे या विषयावर त्यांच्या मनात बराच खल झाला.

एवढ्या मोठ्या महापुरुषाला नकार कसा द्यायचा आणि होकार तरी कसा द्यायचा असे द्वंद्व त्यांच्या मनात सुरू होते. अखेर डॉक्टर मालवणकरांचा सल्ला घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. दुसऱ्याच दिवशी डॉ.सविता डॉ.मालवणकरांशी या विषयावर बोलण्यासाठी गेल्या.धैर्य एकवटून त्यांनी मालवणकरांना बाबासाहेबांनी लिहिलेले ते पत्र दाखवले.त्यावर क्षणभर विचार करत मालवणकर म्हणाले, डॉ.आंबेडकरांनी प्रस्ताव ठेवला आहे.त्यांनी काही जबरदस्ती केलेली नाही. त्यामुळे सर्व गोष्टींचा शांतपणे विचार करा आणि योग्य काय तो निर्णय तुम्हीच घ्या. डॉ.मालवणकरांच्या सल्ल्यानंतर डॉ.सविता अत्यंत गोंधळलेल्या अवस्थेत घरी आल्या. त्यांनी त्यांच्या मोठ्या भावांना विश्वासात घेऊन काय करावे असे विचारले. त्यांना मोठा भाऊ म्हणाला म्हणजे तू भारताची कायदेमंत्रीण होणार.अजिबात नकार देऊ नकोस. एक भाऊ तर त्यांना चिडवू लागला. डॉ.आंबेडकरांचे अनुयायी आंबेडकरांवर जीवापाड प्रेम करतात. ही डॉक्टरीणबाई नकार देते आहे हे कळलं तर तुझी खैर नाही, असे तो गमतीत बोलला. अखेर रात्रभर विचार करून डॉ.सविता यांनीही होकारच द्यायचा निर्णय घेतला. त्यामागे दोन कारणे होती, एक तर डॉक्टर असल्याने त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व सेवा करण्यासाठी त्या प्रवृत्त झाल्या आणि शिवाय त्यांच्या भावनांनीही होकार दिलेला होता. एवढ्या मोठ्या माणसाला त्यांना नकार देताच आला नाही. त्यांनी पत्र लिहून आंबेडकरांना होकार कळवला. कोणत्याही परिस्थितीत आंबेडकरांची प्रकृती सुधरवायची म्हणजे त्यांना देशाची राज्यघटना लिहिण्याचे ऐतिहासिक काम करता येईल असे त्यांनी ठरवले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.शारदा कबीर यांच्या लग्नासाठी १५ एप्रिल १९४८ ही तारीख ठरली. दिल्लीला विवाह उरकणार होता. त्यानंतर मधल्या काळात बाबासाहेब आणि सविता यांच्यात बराच पत्रव्यव्हार झाला. त्यातून त्यांचे नाते अधिकच खुलत गेले. बाबासाहेबांनी विवाहासाठी डॉ.मालवणकरांसह अगदी मोजक्या लोकांना आमंत्रित केले होते. कारण तेव्हा देशात दंगली, तणावाचे वातावरण होते. यावेळी डॉ आंबेडकर दिल्लीच्या १ हार्डिंग्ज व्हेन्यू या सरकारी बंगल्यात राहत होते. १५ एप्रिलला विमानतळावरून डॉ.शारदा कुटुंबीयांसह बाबासाहेबांच्या बंगल्यावर गेल्या. बंगल्यावर जाताच बाबासाहेबांनी सर्वांची विचारपूस केली. सर्वांच्या ओळख भेटीचा कार्यक्रमही झाला.त्यानंतर त्याठिकाणी असलेल्या श्री.चित्रे यांच्या सूनबाई शारदा यांना आत घेऊन गेल्या.त्यांनी शारदा यांना साजशृंगार करण्यास मदत केली.रजिस्ट्रार ऑफ मेरेजेसचे अधिकारीही त्याठिकाणी उपस्थित होते. मोजक्या आप्तेष्टांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आणि डॉ.शारदा यांच्या वतीने त्यांचा भाऊ वसंत कबीर आणि कमलाकांत चित्रे यांनी तर डॉक्टर साहेबांच्या वतीने नागपूरचे रावसाहेब मेश्राम यांच्यासह आणखी एकाने सही केली. १५ एप्रिल १०४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध होऊन त्या शारदा कबीरच्या सविता आंबेडकर झाल्या. लग्नानंरच त्याचे नाव 'शारदा'चे 'सविता' झाले, परंतु बाबासाहेब आंबेडकर त्यांना 'शारू' (शारदा) असेच म्हणत असत.त्यांनी ६ डिसेंबर १९५६ला बाबासाहेब गेल्या नंतर अनेक संकटांना तोंड देत संघर्ष केला.२९ मे २००३ रोजी त्यांचे मुंबई येथे निधन झाले.बाबासाहेबांच्या जिवनातील माता रमाई याचं २७ मे आणि माईसाहेब यांचा २९ मे हा स्मृतिदिन आहे.अशा या महापुरुषांच्या जिवनातील संघर्षात सहभागी असणाऱ्या कष्ट,त्याग आणि जिद्दीने सहकार्य करणाऱ्या माता रमाई आणि माईसाहेब यांच्या स्मृतिदिन दिनास विनम्र अभिवादन.

-------------

सागर रामभाऊ तायडे ९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.

# बाभळगावच्या विलासबागेत जनसमुदायाने केले माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीयमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांना ७९ व्या जयंतीनिमीत्त भावपूर्ण अभिवादन



लातूर / प्रतिनिधी :- माजी मुख्यमंत्री व माजी केद्रींय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांची रवीवार २६ मे रोजी ७९ वी जयंती साजरी करण्यात आली. आदरणीय विलासराव देशमुख यांनी ज्या ज्या पदावर काम केले तेथून विकासाला गती आणि लोकांच्या कल्याणाला चालना देण्याचे काम केले. नक्षत्रामध्ये जसे सुर्य उर्जेचा स्त्रोत म्हणून काम करतो तसे राजकारणाच्या नभात विलासराव देशमुख नावाचे वलय आपल्याला कायम प्रेरणा देत राहणार आहे. त्यांचा जयंती निमित्ताने बाभळगाव येथील विलास बाग येथे देशमुख कुटूंबिय तसेच मोठया जनसमुदायाच्या उपस्थितीत त्यांना सार्वजनीक आदरांजली वाहण्यात आली. रवीवार दि. २६, मे रोजी सकाळी ९ वाजता प्रारंभी विलासबाग, बाभळगाव येथे भावस्वराजली हा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी आदरणीय विलासराव देशमुख आणि देशमुख परिवारावर प्रेम करणारे स्नेही, मित्र, हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी स्मृती स्थळी पुष्पांजली अर्पण करून आपल्या आवडत्या नेत्याला भावपूर्ण आदरांजली वाहिली. लोकनेते विलासराव देशमुख यांना विलासबाग, बाभळगाव येथे सकाळी प्रारंभी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, विलास साखर कारखाना चेअरमन वैशालीताई देशमुख, सौ. सुवर्णाताई देशमुख, सुप्रसिध्द सिने अभिनेते रितेश देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, सौ जेनीलीया देशमुख, सौ. दिपशीखा देशमुख, श्रीमती विजया देशमुख, अभिजीत देशमुख, सत्यजीत देशमुख, डॉ. सारिका देशमुख यांनी आदरणीय विलासराव देशमुख यांना पुष्पांजली अर्पण केली. देशमुख कुटूंबियाकडून आदरांजली अर्पन केल्यानंतर राज्याचे मंत्री ना. संजय बनसोडे, खासदार ओमराजे निबाळकर, माजी मंत्री विनायकराव पाटील, आमदार मोहनराव हंबर्डे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी आमदार धनाजी साठे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, माजी आमदार रवी गायकवाड, शिवसंग्राम संघटनेच्या अध्यक्षा ज्योती मेटे, आबासाहेब पाटील सेलूकर, जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव, नांदेड जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष हणमंत पाटील बेटमोगरेकर, लातूर लोकसभा उमेदवार शिवाजी काळगे, नांदेड लोकसभा ऊमेदवार वसंतराव चव्हाण यांनी आदरांजली अर्पन केली. लोकनेते विलासराव देशमुख यांना अभिवादन करण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. यामध्ये माजी चेअरमन आबासाहेब पाटील, चेअरमन सर्जेराव मोरे, सभापती जगदीश बावणे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी महापौर ड. दिपक सूळ, अशोक गोविंदपूरकर, ड.व्ही.बी.बेद्रे, बसवराज पाटील नागराळकर, माजी चेअरमन धनंजय देशमुख, माजी चेअरमन यशवंतराव पाटील, माजी चेअरमन गणपतराव बाजुळगे, माजी चेअरमन श्रीपतराव काकडे, दिलीप माने, श्रीपाद (पप्पू कुलकर्णी), माजी महापौर स्मिता खानापूरे, लातूर जिल्हा महीला कॉंग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष शिलाताई पाटील, व्हा. चेअरमन ड. समद पटेल, उदगीर तालुका अध्यक्ष कल्याण पाटील, तालुका अध्यक्ष सुभाष घोडके, आरसीसी संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, सभापती शिवाजीराव हूडे, ड. बी. व्ही. मोतीपवळे, संतोष सोमवंशी, व्हा. चेअरमन प्रमोद जाधव, व्हा. चेअरमन विजय देशमुख, व्हा. चेअरमन रविद्र काळे, विजयकुमार ढगे, एस.डी.बोखारे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, कार्यकारी संचालक ए.आर. पवार, मोहन माने, डॉ. लक्ष्मणराव देशमुख, व्हा. चेअरमन लक्ष्मण मोरे, अभय सांळुखे, राजेसाहेब देशमुख, विजयकूमार पाटील, नितीन दाताळ, पुनीत पाटील, प्राचार्य डी.एन.केंद्रे, अनुप मलवाड, डॉ.अशोक पोददार, डॉ.सतिश बिराजदार, मोईज शेख, सिए प्रकाश कासट, राजाभाऊ जाधव, संचालक कैलास पाटील, रवीशंकर जाधव, गणेश एसआर देशमुख, राजेंद्र भोसले, महादेव मुळे, पप्पू देशमुख, मन्मथ किडे, लक्ष्मण कांबळे, पृथ्वीराज शिरसाट, व्यंकटेश पूरी, चंद्रशेखर दंडीमे, लालासाहेब देशमुख, प्रताप पाटील, गोविंद बोराडे, राजकुमार पाटील, मदन भिसे, अमर खानापूरे, सुपर्ण जगताप, राजकुमार जाधव, अशोक गोंविदपूरकर, सुर्यकांत कातळे, धोडीराम यादव, अमर मोरे, दिपक पटाडे, राजेद्र मस्के, इश्वर चांडक, उपसरपंच गोविंद देशमुख, सुनीता आरळीकर, ज्योती पवार, उषा कांबळे, सपना किसवे, पुजा पंचाक्षरी, सिमा क्षिरसागर, संगीता मोळवणे, उषा राठोड, केशरबाई महापूरे, क्रांती नाईकवाडे, संगीता पतंगे, सुलेखा कारेपूरकर, आप्पा बरडे, प्रदिप राठोड, रामराजे अत्राम, हरीभाऊ राठोड, अजय बोराडे पाटील, विनोद वीर, पी.सी.पाटील, दगडूसाहेब पडीले, पत्रकार क्षेत्रातील लोकमत जिल्हा प्रतिनिधी धर्मराज हल्लाळे, दै. एकमतचे संपादक मंगेश डोंग्रजकर, जयप्रकाश दगडे, प्रदिप नणदकर, राम जेवरे, हरी तुगावकर, चंद्रकांत झेरीगुटे, अरूण समुद्रे, शहाजी पवार, संजय सगरे, संजय पाटील निलेगावकर, हरीराम कुलकर्णी, दिपरत्न निलंगेकर, अशोक देडे, अशोक (गट्टु) अग्रवाल, कैलास कांबळे, चंद्रकांत देवकते, सुनील पडीले, संतोष देशमुख, बालाजी सांळुखे, अनिल पाटील, बळवंत काळे, गुरूनाथ गवळी, पंडीत ढमाले, प्रविण कांबळे, गिरीष पाटील, गणेश एसआर देशमुख, भारत सातपुते, रामानुज रांदड, इम्रान सय्यद, तात्यासाहेब देशमुख, चांदपाशा इनामदार, सुर्यभान लांडगे, इसरार सगरे, प्रदिप राठोड, प्रविण सुर्यवंशी, शरद देशमुख, लक्ष्मण पाटील, जितेंद्र स्वामी, हकीम शेख, तबरेज तांबोळी, ड देविदास बोरुळे पाटील, प्रविण पाटील, असिफ बागवान, जब्बार सगरे, सत्तारभाई शेख, गिरीश ब्याळे, रमेश देशमुख, सुंदर पाटील कव्हेकर, राजाभाऊ मोरे, मोहन सुरवसे, अंगद वाघमारे, बालाप्रसाद बिदादा, सचिन सोळूके, रविकीरण सुर्यवंशी, वाल्मीक माडे, राजेसाहेब पाटील, प्राचार्य बुके, दयानंद बिडवे, श्रीनिवास शेळके, सचिन बंडापल्ले, ज्ञानेश्वर सागावे, विजयकुमार चवळे, विजय टाकेकर, बाबा शेख, पंडीतराव धुमाळ, बाळासाहेब बिडवे, गोविंद सुरवसे, राम स्वामी, चंद्रशेखर दंडीमे, गोपाळ बुरबुरे, राजकुमार पाटील, सतिश पाटील, दगडूआप्पा मिटकरी, भारत आदमाने, चंद्रकांत मददे, मनोज चिखले, ब्रिजलाल कदम, संजय पाटील खंडापूरकर, नारायण लोखंडे, सोनू डगवाले, अजय बोराडे, मनोज पाटील, बादल शेख, रमेश सुर्यवंशी, बिभीषण सांगवीकर, बकंट कदम, सहदेव मस्के, सुर्यकांत सुडे, प्राचार्य डॉ सुरेश कुलकर्णी, रवी जोशी, राजेंद्र पवार, जिंतेद्र स्वामी, जगमित्रचे संपादक प्रा. योगेश शर्मा, युनुस मोमीन, बलभीम भाऊराव पाटील, संजय चालुक्य, नारायण सोमवंशी, राजेद्र भोसले, आदीनी आदरांजली वाहीली. आदरणीय विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमीत्त अभिवादन करण्यासाठी उपस्थित असलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवर, विविध पक्ष, संघटना, संस्थाचे पदाधिकारी, कॉंग्रेस पक्ष व सलग्न संघटनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक यांनी विलासराव देशमुख यांच्या भावपूर्ण आठवणी जागवल्या. या प्रसंगी सुप्रसिद्ध सिने पार्श्वगायक गायक मंगेश बोरगावकर व त्यांच्या सहकाऱ्यांकडून शास्त्रीय संगीताच्या भावस्वरांजली कार्यक्रमाच्या माध्यमातून पुष्पांजली अर्पण केल्यानंतर स्वराजली अर्पन करण्यात आली. या सभेचे सुत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे व सचिन सुर्यवंशी यांनी केले.

## लातूरला महात्मा बसवेश्वर विद्यापीठ निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार -माजी ग्राम विकास मंत्री बस्वराज पाटील मुरुमकर

लातूर :-श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरची मुहूर्तमेळ १९६०च्या कालावधीमध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या विचाराला अनुसरून देशीकेंद्र महाराजांनी केली. त्यावेळी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे लावलेले इवलेसे रोपटे आज वटवृक्षाच्या स्वरूपामध्ये आपणास दिसून येत आहे. या संस्थेअंतर्गत शाळा, महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये मिळून एकूण १६ यूनिट्स चालविले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला अनुसरून लातूरमध्ये महात्मा बसवेश्वर विद्यापीठ निर्माण करण्यासाठी केंद्र आणि राज्य पातळीवर आपणास सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी ग्राम विकास मंत्री बस्वराज पाटील मुरूमकर यांनी केले.

लिंगायत शरण फाउंडेशन, (महा.)च्यावतीने श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी सत्कार सोहळा भालचंद्र ब्लड बँक सभागृहामध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उप महापौर चंद्रकांत बिराजदार, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह अध्यक्ष आदिनाथ सांगवे, सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक गुरुलिंग धाराशीवे आणि संचालक महेश हालगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात होऊन उत्तम भूतके यांनी संगीतमय स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना बसवराज पाटील मुरूमकर म्हणाले की, संस्था ही समाजाने दिलेली देणगी असते. त्यामुळे संस्थेच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य लोकांच्या कल्याणाचा व सेवेचा सातत्याने संस्था पदाधिकाऱ्यांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे. नवनिर्वाचित संस्था पदाधिकाऱ्यांना समाजाने दिलेली जबाबदारी त्यांच्या दूरदृष्टी विचारामुळे यशस्वीरित्या पार पाडतील आणि पुढील ५० वर्षात संस्थेला वैभवशाली बनविण्याचा सातत्याने प्रयत्न करतील. नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि नवनिर्वाचित सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांचे कामाचे कौतुक करून सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या. या संस्थेच्या सर्व युनिटद्वारे भविष्यात उज्वल यश प्राप्त करणारी भावी पिढी निर्माण केली जाईल त्यासाठी संस्थेच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे सहकार्याच्या भूमिकेत असल्याचे सांगून लिंगायत शरण फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर साहेबांना श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेविषयी एक वेगळी आपुलकी आहे. या संस्थेतील नवनिर्वाचित सर्व पदाधिकारी हे चाकूरकर परिवाराचे सदस्य आहेत. आमचे संपूर्ण कुटुंब या संस्थेच्या सोबत आहे. संस्था ही समाजातील प्रत्येकाची असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विश्वास आणि अपेक्षा या संस्थेमार्फत पूर्ण केल्या पाहिजे. या संस्थेतील आदिनाथ सांगवे काका, माधवराव पाटील टाकळीकर आणि इतर सर्व संचालक मंडळातील पदाधिकारी सामाजिक भावनेने कार्य करणारी वरिष्ठ मंडळी असल्यामुळे या संस्थेद्वारे गुणवंत व गुणवान विद्यार्थी भविष्यामध्ये निर्माण केले जातील. यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांना वेळ द्यावा लागेल असे सांगून त्यांनी नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी व लिंगायत शरण फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे मनापासून कौतुक करून अभिनंदन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी महापौर चंद्रकांत बिरादार म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी हातात घेतलेले कार्य सिद्धीस जाते याचा मला पूर्ण विश्वास आहे. या संस्थेद्वारे असलेल्या विविध प्रकारच्या शाळा, महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातून शैक्षणिक सेवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून लवकरच ही संस्था मराठवाडा, महाराष्ट्र आणि देशभरात नावारूपास येईल असा आशावादही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

यावेळी संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला अनुसरून शासकीय प्रक्रिया निस्वार्थ भावनेने पार पाडली आहे. आम्हा सर्वांना महात्मा बसवेश्वर आणि देशिकेंद्र महाराज यांचा ईश्वररुपी आशीर्वाद मिळाला आहे. संस्थेमध्ये विश्वस्त म्हणून चॅरिटी स्वरूपात काम केले पाहिजे. चॅरिटी म्हणजे घरचे खायचे आणि बाहेरचे सामाजिक कार्य करायचे असा त्याचा अर्थ आहे. देशीकेंद्र महाराजांनी लावलेल्या रोपट्याचे रूपांतर आज मोठ्या वटवृक्षात झालेले आहे. त्याच्या सावलीमध्ये आपण सर्वांचा आणि समाजाचा विकास होईल. हे विराट आणि वाळवंटात काम करण्यासारखे आहे. पण या विकासरुपी मार्गातील काटे जरी आम्ही दूर करू शकलो तरी महात्मा बसवेश्वर आणि देशीकेंद्र महाराजांच्या विचाराचे स्वप्न पूर्ण होईल. आज बोलण्यापेक्षा कार्य करणे आवश्यक आहे. आम्ही सर्वांनी पुढील पन्नास वर्षाचे संस्था विकासाचे नियोजन केल्याचे सांगून त्यांनी उपस्थित मान्यवर आणि लिंगायत शरण फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे सहृदय आभार मानले.

यावेळी संस्थेचे नानिर्वाचित सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, शरण म्हणजे आश्रय देणे. महात्मा बसवेश्वरांच्या विचाराने पुनीत झालेली आणि देशीकेंद्र महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली मराठवाड्यातील ही पहिली शैक्षणिक संस्था आहे.

## शेगाव येथे आज (२७ मे) ११ वे रमाई महिला चळवळीचे साहित्य संमेलन

### संविधान सन्मान रॅली, उद्घाटन सोहळा, परिसंवाद, पुरस्कार वितरणसोहळा, कवी संमेलन, भीम शाहिरी जलसा असा भरगच्च कार्यक्रम

शेगाव/प्रतिनिधी - रमाई फाउंडेशन, रमाई मासिक, रमाई प्रकाशन व लोकनेते भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठान औरंगाबाद आयोजित ११ वे रमाई महिला चळवळीचे साहित्य संमेलन आज २७ मे (रमाई स्मृतिदिनी) स्थानिक वर्धमान भवन, (जिजाऊ नगरी), शासकीय विश्राम भवनच्या बाजुला (ताराबाई शिंदे परिसर) आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाच्या सुरूवातीला सकाळी ८ वाजता संविधान सन्मान रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संमेलनस्थ काढण्यात येणार आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सामुदायिक बुद्धवंदना झाल्यानंतर सकाळी ९ वाजता संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका डॉ. विजयालक्ष्मी वानखडे यांच्या हस्ते होईल. यावेळी संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध कवयित्री माया दामोदर, स्वागताध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार भाऊ भोजने, भारतीय बौद्ध महासभेचे भीमरावजी तायडे, वंचित बहुजन आघाडीचे दिपक इंगळे, रमाई फाउंडेशनच्या अध्यक्षा, रमाई मासिकाच्या संपादक तसेच ११ व्या रमाई महिला चळवळीचे साहित्य संमेलनाच्या मुख्य संयोजक प्रा. डॉ. रेखा मेश्राम, प्रमुख पाहुणे म्हणुन दिशा पिंकी शेख (माजी संमेलनाध्यक्ष, अ.नगर), अशोकभाऊ सोनवणे (ज्येष्ठ नेते, वं.ब.आ.), डॉ. संजय मून (फुले-आंबेडकर विद्वत सभा), प्रा. संजय खडसे (उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा), अ‍ॅड. के.ई. हरिदास (सत्यशोधक समाज), सविताताई मुंडे (प्र.उ.वं.ब.आ.), शरदभाऊ वसत (ज्येष्ठ नेते, वं.ब.आ.), प्रदीप वानखेडे (जि.प्र. वं.ब.आ.), देवा हिवराळे (उ.अ. वं.ब.आ.), मा. विशाखा सावंग (म.अ. वं.ब.आ.), निलेश जाधव (जि.उ. वं.ब.आ.), मा. वसंत मगर (लोकसभा उमेदवार, बुलडाणा) इंजि. संजय ब्राह्मणे (लोकसभा उमेदवार, रावेर), प्रा. अनिल अंमलकार (जि.स. वं.ब.आ.), मा. प्रा. राजकुमार सोनेकर (जि.स. वं.ब.आ.), गणेश चौकसे (मा. जिल्हाध्यक्ष, वं.ब.आ.), राजाभाऊ भोजने (जि.प. सदस्य, वं.ब.आ.) न.ल. खंडारे (उ.जि. अध्यक्ष, भा.बौ.म.), एस.एस. वले (द.जि.अध्यक्ष, भा.बौ.म.) आदी उपस्थित राहणार आहेत. दुपारी १ वाजता चळवळीतील विद्वानांची राजकीय प्रगल्भता किती? या विषयावर डॉ. संजय मून यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. यावेळी वक्ते म्हणुन डॉ. राजकुमार सोनेकर (ज्येष्ठ अभ्यासक), भास्कर भोजने (फुले-आंबेडकर विद्वत सभा), डॉ. मनोज निकाळजे (फुले-आंबेडकर विद्वत सभा), डॉ. वसंत डोंगरे (फुले-आंबेडकर विद्वत सभा), डॉ. मनोहर नाईक (फुले-आंबेडकरी चळवळ) आदी उपस्थित राहणार आहेत. दुपारी २ वाजता भारतीय स्त्रीवाद - जिजाऊ, ताराबाई शिंदे, सावित्रीमाई फुले या विषयावर डॉ. अशोक इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. यावेळी वक्ते म्हणुन डॉ. भास्कर पाटील (कवी, साहित्यिक), डॉ. कैलास वानखडे (साहित्यिक) मा. संजय डोंगरे (संपादक, अरिय), सुषमा पाखरे (कवयित्री, साहित्यिक) मा. प्रा. प्रविण कांबळे (कवी, साहित्यिक) आदी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी ३ वाजता रमाई गौरव पुरस्कार २०२४ पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. त्यामध्ये स्नेहा जावळे (मुंबई), पार्वता इंगळे (जळगाव जामोद), संगिता ससाणे (शेगाव) इंदुबाई वानखेडे (लोखंडा), वनिता गायकवाड (नांदुरा), निता गवई (जि.प. सदस्य, बोरगाव मंजू), माया नाईक (सभापती, जि.प. मुर्तिजापूर), अ‍ॅड. पूजा दामोदर (शेगाव), अलका डोहाणे (औरंगाबाद), हेमलता शिराळे (सरपंच, कोठारी), सुमन थाटे (खामगाव), उर्मिला भीमराव तायडे (नांदुरा), कुमूदिनी मधाळे (कोल्हापूर), नंदा शेजवळ (दहिसर), सुनंदा रामटेके (उल्हासनगर), विमल शेंडे (नांदेड), जयश्री भगत (वर्धा), रत्ना मनवर (अमरावती), सरिता सातारडे (नागपूर), डॉ. सुजाता तायडे, (शेगाव), पुष्पा कांबळे (बुलडाणा) छाया बांगर (नांदुरा) आदींना सन्मानित करण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता ज्येष्ठ कवयित्री सुरेखा भगत यांच्या अध्यक्षतेखाली कवीसंमेलन होणार आहे. त्यामध्ये सहभागी कवयित्री म्हणुन कल्पना वाहुळे, लता इंगळे, रत्नकला बनसोड, सुनिता इंगळे, शीला जाधव, सुनंदा नागदिवे, जयश्री सरवदे, रजनी फुलझेले, शीला आठवले, प्रा. सुनिता अवचार, उज्वला देबाजे-मोरे, मधुराणी बनसोड, संध्या अडागळे, अलका धनगर, अहिल्या रंगारी, दिपाली दीप, सरीता रामटेके, स्वाती चनकापुरे, सुनिता घोडगे, योगिता वानखडे, ज्योती पंडित, डॉ. . सुनंदा जुलमे, माया दामोदर, डॉ. सुनंदा रामटेके, सुलभाश्री सिरसाट, माया कांबळे, मिना पाटील, सुषमा पाखरे, लता जुंबडे, सुरेखा कांबळे, माला मेश्राम, आम्रपाली रतनशील, जयश्री ढाकरगे, नलिनी मोकळे, नंदा शेजवळ, कविता थोरात, संजीवनी राजगुरू, लता पडघान, वनिता गावंडे, सरीता सातारडे, आशा डांगे, क्षमा बरडे, वसुंधरा मधाळे, सुनंदा रामटेके, अलका धोंडाणे-साखरे आदी उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचा समारोप सायं. ५ वाजता होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सूर्यभान गजभिये, अलका जायभाये, पूजा खेटे, अ‍ॅड. अनिल इखारे, प्रभाकर वरखेडे, दादाराव अंभोरे, अनिल वाकोडे, अतिषभाई खराटे, रविंद्र भेलके, प्रशांत वाघोदे, अरूण सावंग, रमेश डोंगरे, संतोष गवई, अब्दुल मजिद, संघपाल जाधव, शांताराम पोटखेडे, नितीन सूर्यवंशी, शेख सलमान, प्राचार्य सिद्धार्थ मेश्राम, अ‍ॅड. एस.आर. बोदडे, सुरेश साबळे, प्रविण भिडे, डॉ. सुरेश वानखडे, सुशील मोरे, डॉ. विजय तायडे, डॉ. मुकुंद इंगळे, डॉ. सुरेश सिरसाट, डॉ. प्रविण पाटील, अजाबराव वाघोदे, प्रविण पहुरकर, रवी वानखेडे, आर.एन. वानखेडे, डॉ. देवानंद अढाऊ, राजेश हेलोडे, प्रभाकर पहुरकर, राजेंद्र शेगोकार, डॉ. के.बी. इंगळे, डॉ. विद्याधर आठवाल, सिद्धार्थ देवदरीकर, प्राचार्य शिवदास दाभाडे, प्रा. महेंद्र बागडे, भगवान इंगळे, प्रा. विक्रम मोरे, जे.डी. झिने, जितेंद्र सदांशिव, डॉ. दयानंद राऊत, राहूल कांबळे, राजेंद्र इंगळे, अ‍ॅड. प्रशांत दाभाडे, प्रविण विरघट, अ‍ॅड. संघपाल भारसाखळे उपस्थित राहणार आहेत. सायं. ७ वाजता भीमशाहीरी जलसा होणार आहे. या साहित्य संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रमाई फाउंडेशनच्या अध्यक्षा, रमाई मासिकाच्या संपादक तसेच साहित्य संमेलनाच्या मुख्य संयोजक प्रा. डॉ. रेखा मेश्राम, दैवशीला गवंदे, शोभा खाडे, ललिता खडसे, बेबीनंदा पवार, शारदा गजभिये, राजकन्या गोंडाणे, प्रा. विजया सिरसाट, कल्पना वाहुळे, डॉ. प्रज्ञा साळवे, डॉ. रेखा वाघ, डॉ. श्यामल गरूड, डॉ. ललिता गिहे, डॉ. वंदना पाटील, मंगल मून, स्नेहा बनसोडे, सुनंदा जाधव, सुरेखा चौरपगार, सविता अभ्यंकर, नलिनी घनवट, अनिता डोंगरे, जयश्री सरोदे, सरला सदावर्ते, शीला आठवले, सुवर्णा सिरसाट, प्रभा वानखडे, लता इंगळे, सुनंदा नागदिवे, अनुमती वानखडे, लता पडघान, गंगाबाई सुरडकर, संध्या साळवे, करूणा तारू, रमा इंगळे, दीक्षा मेश्राम, चंद्रप्रभा शेगावकर, नालंदा शेगावकर, फुलराणी वानखडे, मनिषा अंकुशराव, लक्ष्मी वानखडे, पूनम वानखडे, दीक्षा वानखडे, कविता वानखडे, चंदा विरघट, विशाखा सावंग, अनिता डोंगरे, अ‍ॅड. किरण तायडे, अ‍ॅड पुजा दामोदर, पार्वती इंगळे, रागिनी तायडे, लक्ष्मी मोरे, गुंफा विरघट आदींनी केले आहे.

## पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी

लातूर :-लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी करण्यात आल्याची माहिती डॉ. अशोक पोद्दार यांनी दिली. पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने सातत्याने अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. वर्षातून किमान सहा ते सात मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे काम या हॉस्पिटलच्या माध्यमातून केले जाते, हे विशेष. आजचे हे शिबीर १४३ वे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे माजी आमदार वैजनाथ शिंदे, आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, आयएमएच्या माजी अध्यक्ष डॉ. सुरेखा काळे, माजी अध्यक्ष डॉ. दीपक गुगळे, डॉ. सतीश बिराजदार, डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. इमरान कुरेशी आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांनी लोकनेत्याच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. या सर्वांचे स्वागत पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ.अशोक पोद्दार यांनी केले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती आणि पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून नियमितपणे अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन केले जाते. डॉ.अशोक पोद्दार यांनीच लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात अशा प्रकारच्या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचा नवा वैद्यकीय सेवा पॅटर्न कार्यान्वित करण्याकामी पुढाकार घेतला, ही बाब सर्वश्रुत आहेच. आरोग्य तसेच सामाजिक क्षेत्रातही ते कायम कार्यरत असतात. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद खऱ्या अर्थाने जोपासण्याचे काम डॉ.अशोक पोद्दार आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने सातत्याने करत असतात. यावेळी बोलताना माजी आ. वैजनाथ शिंदे यांनी डॉ. पोद्दार यांच्या या मोफत आरोग्य विषयक शिबीर उपक्रमाचे कौतुक केले. आज समाजात वावरणाऱ्या प्रत्येक घटकातील नागरिकांना चांगल्यात चांगली आरोग्य सेवा मिळावी यासाठी डॉ. पोद्दार नेहमी प्रयत्नशील असल्याचे पहायला मिळते,असेही ते म्हणाले. डॉ. उमेश कानडे, डॉ. सुरेखा काळे यांनीही या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी बोलताना अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व तपासणी शिबिरांच्या माध्यमातून दरवर्षी हजारो रुग्णांची सेवा करण्याची संधी आपणास मिळते,असे सांगितले. भविष्यात आपल्या हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येईल,असेही ते म्हणाले. लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी १६ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले. १३ रुग्णांची रक्त तपासणी तर ४० रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. तर एका रुग्णाची ५० टक्के सवलतीच्या दरात शस्त्रक्रियाही करण्यात आली. त्याचप्रमाणे शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांच्या सर्व ६९ रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळतेची तपासणी करण्यात आली. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व रुग्णांसाठी विविध औषधी कंपन्यांच्या वैद्यकीय प्रतिनिधींनी मोफत औषधी उपलब्ध करून दिली.

# भारतीय बौद्ध महासभा सिवुड (प) शाखेच्या वतीने बुद्ध जयंती उत्साहात साजरी



नवी मुंबई / के. एच. हनवते :–भारतीय बौध्द महसभा नवी मुंबई जिल्हा अंतर्गत सिवुडस ( प ) शाखेच्या वतीने गणेश मैदान सेक्टर – ४८ सिवुडस ( प ) शाखेचे अध्यक्ष संजय झनके गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक : २३ /०५ / २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासुन रात्री १० वाजेपर्यंत विश्ववंदनीय तथागत भगवान बुध्दांचा २५६८ वा जयंती महोत्सव मोठया जल्लोशात व धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. सकाळच्या सत्रात आदर्शांची पुजा करून आचार्य महादेव वर्के सर यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त विपश्यना साधकांच्या उपस्थितीत सकाळी ७ ते ८ वाजता विपश्यना अनापान व ध्यानसाधना घेण्यात आली. व महादेव वर्क ( आचार्य ) यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहन करण्यात आले. समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा बटालियनचे संरक्षण सचिव दिपक कांबळे गुरुजी आणि त्यांच्या टिमने सलामी दिली. जिवन वाडते गुरुजी यांनी मार्गर्शन केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. ड. संदेश मोरे साहेब (वकील – हायकोर्ट मुंबई ) त्याचप्रमाणे बौद्धजन विकास संघाचे अध्यक्ष राम झेंडे साहेब व त्यांचे इतर सहकारी यांचेही स्वागत करण्यात आले. समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा उपस्थित बटालियनचे स्वागत करण्यात आले.तदनंतर वंदनीय भन्ते मोगलायन यांची अप्रतिम धम्मदेसना झाली. स्वादिष्ट्र खिरदान शरयुताई वाडते यांनी केले. संध्याकाळी ७ ते ८ वाजता वंदनीय भन्ते धम्मकिर्ती व वंदनीय भन्ते धम्मदिप हे तथागत बुद्धांच्या तैलचित्रांच्या मिरवणुकीत सहभागी झाले. त्यांना धम्मयाचना दिली. त्यांनी त्रिसरण पंचशिल घेतले. रथामध्ये तथागत भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेस भन्ते संघरत्न व भन्ते बुद्धदिप यांनी पुष्प अर्पण केले. एन. आर. आय. सागरी पोलीस ठाण्याचे पो . उपनिरीक्षक अरुण पवार साहेबांनी पुष्प अर्पण केले. प्रमोद पाटील ( पोलीस ) यांनी पुष्प अर्पण केले. नंतर संपूर्ण विभागातुन जास्तीत जास्त उपासक व उपासिका मिरवणुकीत सहभागी झाल्या. जल्लोशात बुद्धं सरणं ! गच्छामी । धम्मं सरणं गच्छामी । संघ सरणं गच्छामी ! या सुमधुर अशा आवाजाने संपुर्ण विभागातुन शिस्तबध्द पद्धतीने भव्य मिरवणुक काढण्यात आली. संध्याकाळ अधिवेशनात सर्व धम्मपिठावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आदर्शाची पुजा करण्यात आली. समता सैनिक दलाने मान्यवरांना सलामी दिली. उपस्थित भन्ते संघरत्न व भन्ते बुद्धदिप यांचे स्वागत संजय झनके गुरुजी ( शाखा – अध्यक्ष ) यांनी केले. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत शाखेचे अध्यक्ष संजय झनके , डॉ. संतोष कुसरे ( उपाध्यक्ष ) , सदाशिव ढसाळ ( संघटक ) , सिद्धार्थ सोलसे ( सरचिटणीस ) , चंद्रकांत यशवंते ( सचिव – संरक्षण ) , सुर्यकांत अहीरे ( हिशोब तपासणीस ) , शरद हजारे ( सचिव – पर्यटन ) प्रमिलाताई जाधव ( संघटक ) व इतर कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. जयराम कदम (कोषाध्यक्ष ), गणेश होव्हाळ ( संघटक ) डि. एच. जगताप ( सचिव – संरक्षण ) , मिलिंद मंडपे ( समाजसेवक ) , रमेश जाधव ( समाजसेवक ) राहुल जाधव (समाजसेवक ) विवेक वरणे ,शशी बल्लाळ , संतोष दिवे, नरेंद्र जाधव , मा. अनंत केदारे मा. यु. डी. कदम सुरेंद्र कांबळे , सावंत साहेब ,छायाताई दिवे ( संस्कार – सचिव नवी मुंबई जिल्हा महिला कमिटी ) यांनीही सहकार्य केले. सिवुडस शाखा कार्यकारिणीचे स्वागतही करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व वक्ते केंद्रीय पदाधिकारी अशोक केदारे गुरुजी ( केद्रिय शिक्षक ) तद्वतच केंद्रिय कार्यालयीन सचिव – भारतीय बौद्ध महासभा यांचे अप्रतिम मार्गदर्शन झाले. त्यांच्या मार्गदर्शनाने उपासक व उपासिका भारावुन गेल्या, सिवुडस शाखा उपाध्यक्ष डॉ. संतोष कुसरे साहेब यांनी भरभरून शुभेच्छा दिल्यात. तदनंतर नवी मुंबई जिल्हा पदाधिकारी जयवंत लव्हांडे गुरुजी ( कार्यसम्राट – जिल्हाध्यक्ष ) जिवन वाडते गुरुजी – सरचिटणीस – पालीभाषा अभ्यासक ) शोभाताई कांबळे ( महिला – जिल्हाध्यक्ष ) यांचेही शुभेच्छा पर अप्रतिम मार्गदर्शन झाले. दत्ताश्रय हराळ गुरुजी , प्रकाश भालेराव गुरुजी , विनोद पाचपिंडे गुरुजी , आदरणीय चांदणीताई पाचपिंडे व विभागातील समाजसेवक विशालजी डोळस साहेब ( नगरसेवक ), अमोलजी आयवळे साहेब ( समाजसेवक ) , संतोष पाटील साहेब ( समाजसेवक ), साहित्यीक बापु राऊत , विशाल विचारे साहेब ( समाजसेवक ) चंद्रकांत दाभोळकर , सुजाताताई गवई ( अध्यक्षा – मेत्ता बुद्धिस्ट महिला संस्था , देविदास गवई , राजेंद्र बोरकर साहेब , मिलिंद चक्रनारायण साहेब, नेताजी शेषवारे साहेब , प्रामुख्याने उपस्थित होते. विशाल डोळस साहेब ( नगरसेवक ) यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या. शेवटी संजय झनके गुरुजी सिवुडस शाखेचे अध्यक्ष यांचे अध्यक्षीय भाषण झाले. संपूर्ण सिवुडस शाखा कार्यकारिणी, व करावे गांव शाखा कार्यकारिणी व वंचित बहुजन आघाडी सिवुडस विभाग यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.करावे गांव शाखेचे अध्यक्ष मा. विजय झनके गुरुजी व संतोष कांबळे , संतोष वाढवे , देवानंद मनवर , लांडगे , माधुरीताई सरोदे , बाळु मनवर, विनोद मनवर, सतिष सावळे , प्रेमानंद ढोबळे , राजु खिल्लारे ' साधनाताई वानखेडे, पिंकी सरोदे , आकांक्षा वाढवे , मुनेश्वर ताई , धम्मशिलाताई वाढवे उपस्थित होत्या . या मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन णझडउ ( ख–ड ) भारतीय प्रशासकीय सेवा या परिक्षेत संपुर्ण भारतातुन भव्य यश प्राप्त करणारे आदरणीय विवेक विश्वनाथ सोनावणे यांचे शाखेचे अध्यक्ष संजय झनके यांच्या हस्ते भव्य स्वागत करण्यात आले. व त्यांच्या परिवाराचा भव्य सत्कार करण्यात आला. भव्य बुद्धजयंती महोत्सवाचे प्रास्ताविक प्रा. सिद्धार्थ सोलसे सर यांनी केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचालन अनघाताई जाधव मॅडम यांनी केले. आभारप्रदर्शन सदाशिव ढसाळ यांनी केले. ज्या दानदात्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आंम्हाला मोलाचे सहकार्य केले. त्या सर्व दानदात्यांचे सिवुडस शाखेच्या संपुर्ण कार्यकारिणीच्या वतीने धन्यवाद ! सरणत्तय गाथा घेवुन सिवुडस शाखेच्या वतीने सर्व उपस्थितांना शानदार भोजन देण्यात आले.=ज

# लातूर जिल्हा प्रतिनिधी निवडणूकीमध्ये प्रताप शिवाजीराव रोडगे विजयी

लातूर : महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन संस्थांची संघटना, मुंबई ही संघटना महाराष्ट्रातील संगणक टंकलेखन संस्थांसाठी कार्यरत असलेली संघटना असून संघटनेच्यावतीने प्रत्येक ९ वर्षानंतर विविध पद निवडीसाठी निवडणूका घेण्यात येतात. यावर्षी सन २०२४–२०२९ या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये दिनांक २६/०५/२०२४ रोजी प्रत्येक राज्यातील जिल्ह्यामध्ये जिल्हा प्रतिनिधी या पदासाठी निवडणूक घेण्यात आली. सदर निवडणूकीसाठी उदगीर येथील किर्ती कॉम्युटर टंकलेखन संस्थेचे संस्थाचालक प्रताप शिवाजी रोडगे व लातूर सचिन कॉम्प्युटर टंकलेखन संस्थेचे संस्थाचालक बालाजी केदार खरटमोल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. निवडणुकीमध्ये उदगीर येथील संस्थाचालक प्रताप शिवाजी रोडगे विजयी झाले आहेत. प्रताप रोडगे हे मनमिळावू, संयमी व मित्तभाषी व्यक्तीमत्व असल्यामुळे त्यांच्या निवडीबद्दल संस्थाचालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रताप रोडगे यांना निवडून आणणेसाठी लातूर जिल्हा संघटना जिल्हाध्यक्ष जे. के. वाघमारे, नंदकुमार देशमुख, नयुम पठाण, कांचन कुलकर्णी, रमेश देशमुख, शाहुराज भोसले यांनी परिश्रम घेतले.

नवनिर्वाचित लातूर जिल्हा प्रतिनिधी प्रताप रोडगे हे विजयी झाल्याबद्दल प्रतिस्पर्धी उमेदवार बालाजी खरटमोल यांच्यासह बळवंत कुलकर्णी, मिलिंद सोनकांबळे, गिरिष पोतदार, दिलीप मुकडे, शैलेंद्र बायस, विजय केंद्रे, परमेश्वर वाघमारे, भैय्यासाहेब सोनवणे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या...



## राजेश पवार यांना बहुजनरत्न जीवनगौरव सन्मान पुरस्कार जाहीर

मुरबाड : – सन १९९५ पासून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक चळवळीत सातत्याने काम करणारे हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोळ मुरबाड या तालुक्यातील आगाशी या गावचे राहणारे आहेत.



शालेय जीवनातच सामाजिक कार्याची आवड असल्याने ते १९९५ पासून तालुक्यातील प्रत्येक कार्यक्रमात सहभागी होत असत. पुढे १९९९ मध्ये तालुक्यात एक छोट्या गावात सहकाऱ्याच्या मदतीने माध्यमिक शाळा सूरू केली. तालुक्यात अनेक प्रबोधन पर कार्यक्रम त्या काळात घेण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा असे. तालुक्यात मराठा सेवा संघात त्यांनी काम केले आहे, त्याच बरोबर सा. कोकण वैभव या वार्ता पत्राचे ते उपसंपादक होते, लॉर्ड बुद्धा चॅनल चे मुरबाड प्रतिनिधी म्हणून जबाबदारी होती, त्यानंतर मान्यवर कांशीरामजी यांच्या बहुजन समाज पक्षात कार्यकर्ता, विधानसभा अध्यक्ष, विधानसभा प्रभारी, लोकसभा महासचिव, लोकसभा प्रभारी, प्रदेश सचिव या पदावर अतिशय जबाबदारीने काम केले आहे, सन २०२१ पासून बहुजन समाजात आर्थिक क्रांती व्हावी म्हणून दि भीमाई बिगरशेती सहकारी पतसंस्था स्थापन केली आज पतसंस्थेचे २००० सभासद आहेत. तसेच ते भारतीय बौद्ध महासभेचे तालुका शाखेचे हिशोब तपासणीस या पदावर कार्यरत आहेत. समाजात त्यांचे स्वाभिमानी व प्रामाणिक नेतृत्व म्हणून ओळख आहे. त्यांना ऋणानुबंध समाज विकास संस्था बुलढाणा या संस्थेच्या वतीने बहुजनरत्न पुरस्कार जाहीर झाल्याने मुरबाड तालुक्यात त्यांच्या सहकाऱ्यात आनंदाचे वातावरण आहे.

# लातूर ठरले 'ग्रामीण टी १०'मध्ये चॅम्पियन

### लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपमध्ये पटकावले १ लाखाचे प्रथम पारितोषिक; गतविजेता रेणापूर यंदा उपविजेता





लातूर, प्रतिनिधी : लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला (दि.२५, शनिवार) लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या अंतिम सामन्यात लातूर शहर संघाने बाजी मारत लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप: ग्रामीण टी १०'चा प्रथम क्रमांकाचा किताब पटकावला. तर रेणापूर संघ उपविजेता ठरला. लातूर शहर संघाला १ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक आणि गोल्डन ट्रॉफी तर रेणापूर संघाला ५१ हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकारातून लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियशिप : ग्रामीण टी १० स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाचा चॅम्पियन होण्यासाठी रेणापूर आणि लातूर शहर संघात रोमहर्षक अंतिम लढत झाली. यावेळी माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, अभिनेते रितेश देशमुख, अभिनेत्री जेनेलिया देशमुख, आमदार धिरज देशमुख, दीपशिखा धिरज देशमुख, राहील रितेश देशमुख, वंश धिरज देशमुख, दिवियाना धिरज देशमुख, रीआन रितेश देशमुख, माजी आमदार त्र्यंबक भिसे, श्रीशैल उटगे उपस्थित होते. यावेळी लोकनेते विलासराव देशमुख गोल्डन ट्रॉफीचे अनावरण रितेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रेणापूरच्या रेणुका क्रिकेट क्लब संघाने नाणेफेक जिंकत क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पहिल्यांदा फलंदाजीला उतरलेल्या लातूर शहरातील ए. के. युवा मंच क्रिकेट क्लब या संघाने १० षटकात ५ गडी गमावत १४१ धावांचे आव्हान उभे केले. हे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या रेणापूर संघाच्या सलामीच्या फलंदाजांनी आक्रमक फटकेबाजी केली. त्यांनी पहिल्या ३ षटकात ५० धावा जोडल्या. त्यानंतर सलामीचे दोन्ही फलंदाज बाद झाल्याने सामना रंगतदार स्थितीत पोहचला. रेणापूरला विजयासाठी शेवटच्या षटकांत ३० धावांची गरज असताना रेणापूरने केवळ १६ धावा केल्याने विजयाने हुलकावणी दिली. आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते लातूर शहर संघाचे कर्णधार मियाँखान पठाण यांना १ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक, गोल्डन ट्रॉफी तर उपविजेता ठरलेला रेणापूरचा संघ व कर्णधार बालाजी दुड्डे यांना ५० हजारांचे द्वितीय पारितोषिक, मेडल देण्यात आले. उत्कृष्ठ गोलंदाजीचा किताब सलाम शेख (लातूर शहर) यांना तर, उत्कृष्ठ फलंदाजीचा किताब युनुस मणियार (अहमदपूर) यांना देण्यात आला. मालिकावीरचा किताब एम अहमद (लातूर शहर) यांना देण्यात आला. यावेळी यशवंतराव पाटील, सर्जेराव मोरे, श्रीपती काकडे, विजय देशमुख, रविंद्र काळे, सत्यजित देशमुख, अनंतराव देशमुख, संभाजी सूळ, प्रमोद जाधव, अनुप शेळके, सुनील पडिले, उमाकांत खलंग्रे, शेषराव हाके, किरण जाधव, सचिन पाटील, सचिन दाताळ, सुभाष घोडके, रमेश सूर्यवंशी, इम्रान सय्यद आदीसह क्रिडाप्रेमी उपस्थित होते. या वेळी अंतिम सामन्यापूर्वी मुलींच्या पिंक आणि पर्पल संघात सामना झाला. अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात पर्पल संघाने पिंक संघावर मात केली. दिव्या मस्के सामनावीर ठरली.

'ग्रामीण टी १०'मुळे ग्रामीण भागातील टॅलेंट पुढे येईल – रितेश देशमुख

आमदार धिरज देशमुख यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. धिरज देशमुख क्रिकेटचे चाहते आहेत, ग्रामीण भागातील युवकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस होता. त्याला मूर्त रूप मिळतेय, याचा आनंद आहे. ग्रामीण टी १० ही स्पर्धा कौतुकास्पद आहे. गावातील तरुणांना पुढे येण्यासाठी संधी मिळत नाही. अशांसाठी ही स्पर्धा असून या स्पर्धेच्या माध्यमातून चांगला खेळ आणि खेळाडू पुढे येतील. खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा होता. तो पुढाकार ग्रामीण टी १० ने घेतला आहे. गावातील टॅलेंट ही स्पर्धा पुढे आणेल. त्यामुळे ही स्पर्धा आता लातूरपूरती मर्यादित रहायला नको, असे सिनेअभिनेते रितेश देशमुख यांनी यावेळी सांगितले.

खेळाडू, प्रेषकांचा चांगला प्रतिसाद – आ. धिरज देशमुख

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, आई वैशालीताई देशमुख, माजी मंत्री आमदार अमित देशमुख आणि मांजरा परिवाराच्या सहकार्याने तिसऱ्यांदा लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनचे यशस्वी आयोजन केले. खेळाडू, क्रीडारसिक, प्रेक्षकांचाही चांगला प्रतिसाद लाभतो आहे, याचा मनस्वी आनंद आहे अशी भावना आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

# दोन ट्रॅक्टर वर तहसीलदाराची कारवाई, अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्यावर धाड



किनवट . प्रतिनिधी. (शेख शौकत)– किनवट तालुक्यातील उनकेश्वर येथे २५ मे रोजी सकाळी तहसीलदार श्रीमती शारदा चौंडेकर यांनी मुद्दामहून रेतीवर आळा घालण्याच्या हेतुनेच दौरा काढला होता. श्रीमती चौंडेकरांनी अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून मांडवी पोलीस ठाण्यात लावण्यात आले आहे. अशा दौऱ्याचे सातत्य राखल्यास तस्करांच्या मुसक्या आवळल्या जाणार आहे. तहसिलदार श्रीमती चौंडेकरांच्या पथकात मंडळ अधिकारी गाडे, तलाठी अंकुर सकवान, तलाठी बोधगिरे, तलाठी सटलावार, तलाठी शिरगुरवारांचा समावेश होता. विशेष म्हणजे पोलीस संरक्षणा शिवाय त्यांचा हा दौरा होता. त्यांच्या धाडसाबद्दल रेती तस्करांची भंबारी उडाली तर जनसामान्यांसह पर्यावरण प्रेमींकडून कौतूकही केले रेती तस्कर वर वारंवार कारवाई करावीची अशी अपेक्षा जनतेतून होत आहे

# शुभम हनवते यांनी एस.एस.सी. बोर्ड परिक्षेत ८१.८०% मार्क्स मिळवून घवघवीत यश संपादन केले

नवी मुंबई / के. एच. हनवते :– आपले धम्मबंधू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ पत्रकार व बौद्धाचार्य आयु. कल्याणराव हनवते यांचे द्वितीय सुपुत्र चि. शुभम कल्याणराव हनवते यांनी एस.एस.सी. बोर्ड २०२४ परिक्षेत ८१.८०% मार्क्स मिळवून घवघवीत यश संपादन केले, त्याबद्दल त्याचे हनवते, सावंत, सरवदे व मित्र परिवारा कडून सर्वत्र आनंद व्यक्त करून शुभु चे हार्दिक अभिनंद व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत. विशेष म्हणजे गेली २०१८ मधे शुभु ची आई आम्रपाली हिचे गेली पाच वर्षांपुर्वी अपघाती निधन झाले असून या मुला वरील आईची छत्रछाया हरवलेली आसुन पण कल्याणराव हनवते हे आपल्या दोन मुला समवेत नेरूळ नवी मुंबई या ठिकाणी आपला उदरनिर्वाह करून मुलांची जडणघडण करीत आहेत. त्यात शुभु – सुमेध हे आपले घरातील सर्व घरकाम करून शिक्षण शिकत आहेत, सुमेध कल्याणराव हनवते हा (बि ई इंजीनिअर) मधे शिक्षण घेत आहे आणि यांच्या शिक्षणावर कल्याणराव एच. हनवते हे जास्त लक्ष देतात व त्यांना कोणतीच कमतरता भासुदेत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो तो प्राशन करील तो एक ना एक दिवस गुर गुरल्या शिवाय रहाणार नाही..! एक दिवस उपाशी रहा पण आपल्या मुलांना शाळा शिकवा आणि म्हणून आपले आदर्श बुद्ध, फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हा हनवते परिवार मार्गक्रमण करीत आहे, महापुरुषांच्या विचारांनी झपाटलेला एक प्रमाणीक कार्यकर्ता व आंबेडकर आनुयायी यांची एकच तळमळ आहे की, आपल्या मुलांनी खुप शिक्षण शिकावे, फार मोठे व्हावे व समाजाची आणि देशाची सेवा करावी हिच एक सदिच्छा.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE